0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-** १) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दि.२०/०७/२०११ रोजी प्राप्त झालेले कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५३/२०११/जा. ५५८ दि.२२/०७/२०११.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५३/२०११/जा. ५५९
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.

दिनांक : २२/०७/२०११.

## अंतरीम आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

दिनांक १५/०७/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयाच्या फिरत्या पथकातील अधिकारी /कर्मचारी पंचासह साई प्रकाश बॅन्कवेट हॉलच्या समोर, टागोर नगर, ग्रुप नं. ३, कनमुटकर मार्ग, विक्रोळी (पूर्व) येथे दुपारी १२:०० वाजता सुमारे १०० फुटावर उभ्या असलेला टेम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-७४३९ जवळ पोहोचले. सदर टेंम्पोमध्ये बसलेल्या व्यक्तीस त्याचे नाव.गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद हुसेन जियाउद्दीन शेख असे सांगून सदर टेंम्पोचा चालक असल्याचे सांगितले. सदर इसमास त्याच्या टेंम्पोमध्ये काय आहे, कोठून आणले व कोणाच्या सांगण्यावरुन आणले, याची चौकशी केली असता, सदर टेंम्पोमध्ये अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ३० ई/ १३५ मधून १५० बाचके, वजन ७५०० किलो गहू वाशी येथे घेऊन जाण्यासाठी आणलेला असून सदर काम टेंम्पोचे मालक मनुराज राजन नारायण यांच्या सांगण्यावरुन केल्याची त्याने माहिती दिली.

त्यानंतर चालक शेख यास मनुराज यांना दुरध्वनीवरुन बोलविण्यास सांगितले असता, त्याने मनुराज यांना बोलाविले. मनुराज उपस्थित झाल्यानंतर त्याला त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव मनुराज राजन नारायण असे सांगून ते माल वाहतुकदार असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे त्यांनी वसंत जयस्वाल (पूर्ण नाव पत्ता माहित नाही) याच्या सांगण्यावरुन चालक शेख याचेमार्फत टेंम्पो क्र. एमएच-०४-ईवाय-७४३९

